


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - १ ले. ✻ अंक २५२ वा. ✻ शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 1 ✻ Ishue - 252 ✻ Saturday 12 April 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

## तारळी धरणावरील उपसासिंचन योजनांची कामे पूर्ण करावीत : मंत्री शंभूराज देसाई



सातारा : तारळी धरणावरील ज्या उपसा सिंचन योजनांची कामे अपूर्ण आहेत ती कामे येत्या मे महिन्यापर्यंत पूर्ण करावीत. तसेच ज्या उपसासिंचन योजना पूर्ण कायान्वीत आहेत परंतु तेथील ट्रान्सफॉर्मर चोरीला गेल्या आहेत, अशा ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवावेत व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार उपसासिंचन योजनेतून शेतीला पाणी द्यावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री श्री. देसाई यांनी तारळी धरणावरील उपसा सिंचन व मोरणा (गुरेघर) धरणांतर्गत सुरु असलेल्या बंदीस्त पाईपालईन कामांचा आढावा घेतला. या प्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, जयंत शिंदे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी मनोहर गव्हाड, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोपे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.तारळी धरणावरील पूर्ण झालेल्या उपसासिंचन योजनेतून पूर्ण क्षमतेने शेतीसाठी पाणी मिळत नसल्याचे शेतकरी सांगत आहेत अशा उपसासिंचन योजनेच्या पहाणी प्रत्येक गावातील पाच शेतकरी घेऊन पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांनी पुन्हा सर्व्हे करावा. सर्व्हेक्षणात काही दुरुस्ती करावयाच्या आढळल्यास त्या तात्काळ कराव्यात. त्याचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देशही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले. बांबावडे उपसा सिंचन योजना टप्प २ व तारळे उपसासिंचन योजना टप्पा २ ची कामे ५० टक्के पूर्ण झाली आहेत. ही कामे येत्या मे महिन्याअखरे पूर्ण करावीत. तसेच नाटोशी उपसासिंचन योजनेची पंप हाऊस दुरुस्तीसह उपसा सिंचन योजनेत काही सुधारणा करावयाच्या असल्या त्या कराव्यात या उपसिंचन योजनेंतर्गत असणाऱ्या शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचले पाहिजे.

मोरणा (गुरेघर) धरणांतर्गत येणाऱ्या बंदीस्त पाईपलाईनचे काम तातडीने पूर्ण करावे. तसेच ज्या शेतकऱ्याच्या जमिनीमध्ये पाईपलाईन जात आहे अशा शेतकऱ्यांना आर्थिक मोबदल्यासह निर्वाह भत्ता येत्या १५ एप्रिलपर्यंत द्यावा. बंदीस्त पापलाईनच्या कामाला गती येण्यासाठी पोलीस व महसूल विभागाची मदत घ्यावी, असे निर्देशही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले.

## आ.अतुलबाबा व जयंतकाक यांची भेट



कराड : कराड दक्षिणचे लोकप्रिय आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांची श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट कराडचे चेअरमन, श्री गजानन हौऊसिंग सोसायटीचे चेअरमन, श्री जयंतकाका पाटील यांनी कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट कराड येथे सदिच्छा भेट घेतली आहे.

आ. डॉ. अतुलबाबा भोसले आणि जयंतकाका पाटील यांनी विविध विषयावर चर्चा केली. या भेटीमुळे कराड तालुक्यामध्ये चर्चा सुरू झाली आहे. येणाऱ्या काळामध्ये कराड दक्षिण आणि उत्तरमध्ये महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडू शकतात असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी कराड नगरपरिषद विरोधी पक्ष नेते श्री सौरभ पाटील (तात्या),मलकापूर नगरपरिषदेचे बांधकाम सभापती श्री राजेंद्र यादव (आबा),दि प्रीतिसंगम सहकारी बँक, कराडचे चेअरमन श्री नितिन रामभाऊ कणसे, गोटे येथील माजी उपसरपंच श्री अमित पाटील, श्री प्रमोद शिंदे, श्री विनायक पाटील उपस्थित होते.

## मंत्री शंभूराज देसाई यांनी केले महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन




कराड - महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयात परिषद सभागृहात झालेल्या कार्यक्रमास जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख आदी उपस्थित होते.

## राज्यात लवकरच नवी सर्किट ट्रेन -मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वेव्हस समिट २०२५ हजेरी लावली. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंट या ठिकाणी 'वेव्हस समिट २०२५' पार पडत आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव विविध ऑडिटोरिअम्सची पाहणी केली. या पाहणीनंतर त्यांनी एकत्र पत्रकार परिषद महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या. महाराष्ट्रात १ लाख ७३ हजार कोटींची कामे सुरू आहेत. यात मुंबईसह इतर परिसरात १७ हजार कोटींची कामे सुरू आहेत अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुंबईतील अनेक रेल्वे प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. राज्यातील १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. महाराष्ट्रासाठी १ लाख ७३ हजार कोटीचे रेल्वे प्रकल्प उभारले जाणार आहेत. यावर्षी जवळपास २४ हजार कोटी राज्याला मिळाले आहेत. राज्यात छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरु करणार आहे. या सर्किट ट्रेनने राज्यातील ऐतिहासिक स्थळांना भेट देता येणार आहे. सर्किट ट्रेनने १० दिवस प्रवास करता येणार आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

विदर्भाचा छत्तीसगड-तेलंगणासोबतचा व्यवहार वाढणार आहे. गोंदिया बल्लारशा रेल्वे लाईनचा दुहेरीकरण याकरता ४८१९ कोटी रुपये हे केंद्र सरकारने या ठिकाणी दिलेले आहेत आणि यामुळे निश्चितपणे जो विदर्भाचा भाग आहे. त्याला एक मोठा फायदा होणार आहे. विशेषत: छत्तीसगड आणि तेलंगणाचा जो व्यापार आहे व्यवहार आहे हा विदर्भाचा वाढण्याच्या दृष्टीने ही एक अत्यंत महत्त्वाचे नाही, कारण आपल्याला माहिती आहे की गोंदिया अशा ठिकाणी आहे की जिथे मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या दोघांची बॉर्डर आहे आणि पलीकडे बल्लारशापासने तेलंगणा आणि तिकडे आंध्र प्रदेश आपल्याला मिळतो. त्यामुळे अतिशय स्ट्रॅटेजीक अशा प्रकारची ही जी लाईन आहे असेही देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

**१३२ स्टेशनचा विकास केला जाणार**

विशेषत: १३२ स्टेशन्स महाराष्ट्रातील केंद्र सरकारने रेल्वे मिनिस्ट्री डेव्हलपमेंट करता घेतलेली आहे. त्यामध्ये आपले छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस देखील आहे आणि महाराष्ट्रातले जवळजवळ सगळे महत्त्वाचे स्टेशन. १ लाख ७३ हजार कोटी रुपये हे रेल्वे बजेटमध्ये आपल्याला मिळालेले आहेत आपण जर बघितले तर यूपीएच्या दहा वर्षात दहा हजार कोटी रुपये देखील एकत्रितपणे दहा वर्षात मिळालेले नाही, अशीही माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**छत्रपती शिवाजी महाराज सर्किट**

छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हे देखील या ठिकाणी सुरू होणा-या ज्याच्यामध्ये अतिशय सुंदर अशा प्रकारची हायकोलीक रेल्वे दहा दिवसांचा टूर हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जी काही विविध महत्त्वाचे किल्ले आहेत किंवा जागा आहेत आणि अर्थातच त्याच्याशी संबंधित इतर जे काही आपले सांस्कृतिक स्थळ आहेत याला जोडणारा येथील सुरुवात ही रेल्वे विभाग त्या ठिकाणी करतो आहे असेही देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

## शिक्षण संस्थातर्फे बाळासाहेब पाटील यांचे अभिनंदन




कराड - माजी सहकार व पणनमंत्री सह्याद्रि शिक्षण संस्था व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखालील सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये आदरणीय पी.डी. पाटील पॅनेल बहुमताने विजयी झालेबद्दल सर्व संस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. सदर सत्कार प्रसंगी संस्थेचे सचिव संभाजी चव्हाण, यशवंतनगर येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. एस. राऊत, न्यू इंग्लिश स्कूल करवडीचे मुख्याध्यापक ए.एस. थोरात, सह्याद्रि इंग्लिश मिडीयम स्कूल मसूर (माळवाडी) चे प्राचार्य पी. एस. भोसले यांच्यासह सर्व शाखेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील पीकविम्यातून कंपन्यांना सुमारे ११ हजार कोटींचा नफा

मुंबई : पीकविम्यातून शेतकरी कंगाल;पीकविम्यातून शेतकरी कंगाल, तर कंपन्या आर्थिकदृष्ट्या मालामाल झाल्याचे समोर आले आहे. पीकविमा नफ्यातून कंपन्यांना देशभरात तब्बल ५० हजार कोटींच्या खिरापतीचा लाभ मिळाला. एकट्या महाराष्ट्रातून या कंपन्यांना तब्बल साडे दहा हजार कोटींचा नफा झाल्याचे समजते.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी देशोधडीला लागतो. अतिवृष्टी, पूर, वादळी वारे, भूस्खलन सारख्या नैसर्गिक संकटामुळे पिकांचे नुकसान होते. यातून शेतकरी सावरावा यासाठी केंद्र सरकारने २०१६-२०१७ पासून पंतप्रधान पीकविमा (पीएमएफबीवाय) सुरू केली. मात्र, या योजनेच्या हेतूलाच हरताळ फासला असून पीकविमा कंपन्याच मालामाल होत असल्याचे समोर येत आहे. नैसर्गिक संकट, अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, पिकांवर पडणारे रोगांमुळे अनेकदा हातातोंडाशी आलेले पीक शेतक-यांच्या घरी येत नाही. त्यामुळे या नुकसानीची भरपाई मिळावी.

## पाच वर्षीय मुलीचा गळा आवळून खून



कराड - वाठार (ता. कराड) येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. एका पाच वर्षीय बेपत्ता मुलीचा गळा आवळून खून केल्याचे समोर आले. संस्कृती रामचंद्र जाधव असे खून झालेल्या मुलीचे नाव आहे. या प्रकरणी संशयित म्हणून १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला कराड तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. संशयित मुलीसोबत कुटुंबियांचीही चौकशी सुरू आहे. तसेच गावातील एका संशयितालाही चौकशीसाठी कराड पोलिसांनी ताब्यात घेतले.

घटनास्थळी रात्रभर पोलिसांकडून ड्रोनद्वारे शोध सुरू होता. सातारा जिल्ह्याच्या अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडू-पाटील, उप पोलीस अधीक्षक अमोल ठाकूर, पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांच्यासह पोलीस पथकाच्या श्वान पथकाने रात्रभर शोध सुरू होता. पहाटे पाच वाजता मुलीचा मृतदेह उसाच्या शेतामध्ये आढळून आला. कराड तालुक्यातील वाठार-रेठरे मार्गावर ही घटना घडली आहे. संस्कृती जाधव या चिमुकलीवर कराड येथील स्व. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले आहे. कराड तालुका पोलिसांकडून घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वेगाने तपास सुरू असून अन्य कोणते कारण या खुनामागे आहे का? याचा सखोल तपास सुरू आहे.

**१४ वर्षे अल्पवयीन मुलगी पोलिसांच्या ताब्यात**

## जलसंपदा विभाग लोकाभिमुख करावा

## महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे : मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

सोलापूर : जलसंपदा विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाशी सर्व यंत्रणा, नागरिक, शेतकरी व अन्य घटक जोडले गेले आहेत. त्यामुळे जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करून महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आज दिल्या.

जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल २०२५ कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या आयोजनासंदर्भात जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक संपन्न झाली. यावेळी जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजीव टाटू उपस्थित होते. बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.

मंत्री श्री. विखे-पाटील म्हणाले, या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जावा. लोकाभिमुख कार्यक्रमाच्या माध्यमातून विभागाची वेगळी ओळख निर्माण झाली पाहिजे या पद्धतीने जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात यावेत. सिंचन व्यवस्था अधिक प्रभावीपणे होण्यासाठी कालवे प्रवाही राहणे अत्यंत महत्त्वाचे आहेत. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे सु. स. खांडेकर, अधीक्षक अभियंता भीमा कालवा मंडळाचे धि. साळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता पी. व्ही. पाटील तसेच संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी सहभागी झाले होते.

# संपादकीय....

## पुन्हा घेतली उसळी...!

७ एप्रिल सोमवारचा दिवस शेअर बाजारासाठी 'ब्लॅक मंडे' ठरला. भारतातील प्रमुख शेअर बाजारांनी एकाच सत्रात सुमारे ५ टक्क्यांची आपटी खाल्ली. टाटा, अंबानी, अदानीसह बहुतांश बड्या उद्योगसमूहांचे शेअर्स सोमवारी मोठ्या प्रमाणात घसरले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या करवाढीनंतर आणि चीनकडून 'जशास तसे' प्रत्युत्तर मिळाल्यानंतर जागतिक बाजारपेठेत झालेल्या पडझडीमुळे आर्थिक मंदीची भीती निर्माण झाली आहे. सोमवारी जगभरातील प्रमुख शेअर बाजार कोसळले. भारतात मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स एकाच व्यवहारात तब्बल २२२६.७९ अंकांनी घसरला. निफ्टीतही जवळपास ३ टक्क्यांची घसरण नोंदली गेली. मुंबई शेअर बाजारातील ही गेल्या १० महिन्यांतील एका दिवसातील सर्वांत मोठी घसरण आहे. या आधी ४ जून २०२४ रोजी सार्वत्रिक निवडणूक निकालादरम्यान शेअर बाजारात मोठी घसरण झाली होती.

सोमवारच्या 'ब्लॅक मंडे'मुळे मुंबई शेअर बाजारातील गुंतवणूकदारांना १४ लाख कोटी रुपयांचा फटका बसला आहे. बाजारात सूचिबद्ध कंपन्यांचे बाजारमूल्य शुक्रवारच्या ४०३ लाख कोटी रुपयांवरून थेट ३९० लाख कोटी रुपयांवर येऊन ठेपले. अमेरिकेत महागाई नाहीच असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. तेलाचे दर खाली आले आहेत, व्याजदरही कमी आहेत, अन्नधान्याचे दरही किमान आहेत. याचा अर्थ अमेरिकेत महागाई नाही असे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी म्हटले आहे. अमेरिकेतील शेअर बाजारात सातत्याने पडझड होत असताना ट्रम्प यांनी फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कपात करावी अशी सूचना केली. १३.२ टक्के घसरणीसह हाँगकाँग शेअर बाजाराने १९९७ नंतरची सर्वांत मोठी आपटी खाल्ली. २०२१ नंतर पहिल्यांदाच अमेरिकन कच्च्या तेलाचा भाव ६० डॉलर प्रति बॅरलच्या खाली आला. याचवेळी १ लाख डॉलरच्या नव्या शिखरावर पोहोचलेला बिटकॉईन ७८ हजार डॉलरच्या खाली आला. टॅरिफ मागे घेण्यास ट्रम्प यांनी नकार दिल्याने जागतिक व्यापाराला धक्का बसला. यावर कडी करताना ट्रम्प यांनी चीनला नव्याने वाढीव शुल्काची धमकी दिली. त्यामुळे जगभरात अस्थिरता आणि अनिश्चितता आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारतीय गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ४६ लाख कोटी रुपयांची घट झाली.

शेअर बाजार सुरू होताच सेन्सेक्स ३ हजार अंकांनी खाली आला. निफ्टीमध्ये ९०० अंकांची घसरण झाली. त्यामुळे सोमवारी भारतीय गुंतवणूकदारांचे १९ लाख कोटी बुडाले. सायंकाळी काही अंशी बाजार सावरला. व्यापारयुद्धामुळे महागाई वाढण्याची शक्यता आहे. व्यापारयुद्धाची धग अमेरिकन अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचली आहे. अशीच स्थिती राहिल्यास संपूर्ण जगाच्या आर्थिक अडचणी वाढू शकतात. भारतासारख्या देशालाही याची फार मोठी किंमत मोजावी लागू शकते. यामुळे जगभरात महागाईच्या झळा अतिशय तीव्र होणार आहेत. यात सर्वसामान्य माणूस भरडला जाणार आहे. जे. पी. मॉर्गनच्या अंदाजानुसार अमेरिका आणि जगभरात मंदीची शक्यता ६० टक्क्यांवर पोहोचली आहे. ट्रम्प यांनी सत्तेवर आल्यावर आयात करवाढ करू असे म्हटले होते. त्यानुसार जगभरातील देश सावध झाले होते. पण ट्रम्प नेमकी काय घोषणा करणार याचा अंदाज येत नव्हता. एकदाचा आयात करवाढीचा निर्णय जाहीर झाला आणि जगभरात मोर्चेबांधणी सुरू झाली. भारताकडून मात्र काहीच उत्तर दिले गेले नाही. त्यामुळे मोदी यांनी ट्रम्प यांच्यासमोर नांगी टाकली अशी चर्चा सुरू झाली. त्याबाबत तशी उदाहरणेही पुढे आली. अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणा-या भारतीय नागरिकांच्या हाता-पायात बेड्या घालून त्यांना भारतात पाठवण्यात आले.


या अपमानास्पद प्रकाराबाबत भारत सरकारने निषेधाचा एकही सूर उमटवला नाही. अमेरिकेच्या आयात करवाढीमुळे भारतीय शेअर बाजारात प्रचंड पडझड झाली. परंतु त्याविरोधात मोदी सरकारने साधा 'ब्र' ही उच्चारला नाही. अजूनही अमेरिकेत अनेक भारतीय नागरिक बेकायदेशीरपणे राहत आहेत. त्याबाबत अथवा त्यांना परत आणण्याबाबत मोदी सरकारने आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारतीय नागरिकांची आणि गुंतवणूकदारांची जी घुसमट होत आहे त्याबाबत केंद्र सरकारला तटस्थ राहता येणार नाही, काहीतरी निर्णय घ्यावाच लागेल. अमेरिकेच्या आयात शुल्काचे भारतावरील विपरीत परिणाम एका दिवसापुरतेच मर्यादित नाहीत. आगामी काळ यापेक्षाही खडतर असू शकतो. त्या दृष्टीने केंद्र सरकारला तयार रहावे लागेल.

# भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम : मारुति

**मनोजवम् मारुततुल्यवेगञ्,**
**जितेन्द्रियम् बुद्धिमतां वरिष्ठम् ।।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं,**
**श्रीरामदूतं शरणम् प्रपद्ये ।।**

अर्थात् मनोवेगाने जाणारा, वाऱ्याप्रमाणे वेगवान, जितेंद्रिय, बुद्धिमानांमध्ये श्रेष्ठ, वायुपुत्र, वानरसमुदायाचा अधिपती आणि श्रीरामाचा दूत, अशा मारुतीला मी शरण आलो आहे.

**मारुतीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते.**



लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच जवळचा वाटणारा एक देव म्हणजे 'मारुति' ! मारुति हा सर्वशक्तिमान, महापराक्रमी, महाधैर्यवान, सर्वोत्कृष्ट भक्त व संगीतज्ञानमहंता म्हणूनही प्रसिद्ध आहे. जीवनाला परिपूर्ण करणारे जे जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे मारुति. शक्ती, भक्ती, कला, चातुर्य आणि बुद्धीमत्ता यांनी श्रेष्ठ असूनही प्रभु रामचंद्रांच्या चरणी सदैव लीन रहाणार्या मारुतीच्या जन्माचा इतिहास आणि त्याची काही गुणवैशिष्ट्ये या लेखातून जाणून घेऊया.

**जन्माचा इतिहास** – राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्रकामेष्टी यज्ञ' केला. तेव्हा यज्ञातून अग्निदेव प्रगट होऊन त्याने दशरथाच्या राण्यांसाठी पायस (खीर, यज्ञातील अवशिष्ट प्रसाद) प्रदान केला होता. दशरथाच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणार्या अंजनीलाही पायस मिळाले होते आणि त्यामुळेच मारुतीचा जन्म झाला होता. त्या दिवशी चैत्रपौर्णिमा होती. तो दिवस 'हनुमान जयंती' म्हणून साजरा करतात. वाल्मीकिरामायणात (किष्किंधाकांड, सर्ग ६६) पुढीलप्रमाणे हनुमानाची जन्मकथा दिली आहे – अंजनीच्या पोटी हनुमान जन्मला. जन्म झाल्यावर 'उगवणारे सूर्यबिंब हे एखादे पक्व फळ असावे', या समजुतीने हनुमानाने आकाशात उड्डाण करून त्याकडे झेप घेतली. त्या दिवशी पर्वतिथी असल्यामुळे सूर्याला गिळण्यासाठी राहु आला होता. सूर्याकडे झेपावणारा हनुमान हा दुसरा राहुच आहे, या समजुतीने इंद्राने त्याच्यावर वज्र फेकले. ते हनुवटीला लागून ती छाटली गेली. यावरून त्याला 'हनुमान' हे नाव पडले.

**१. कार्य व वैशिष्ट्ये**

सर्वशक्तिमान : सर्व देवतांमध्ये फक्त मारुतीला वाईट शक्ती त्रास देऊ शकत नाहीत. लंकेत लाखो राक्षस होते, तरीही ते मारुतीला काही करू शकले नाहीत. जन्मतःच मारुतीने सूर्याला गिळण्यासाठी उड्डाण केले अशी जी गोष्ट आहे, तीतून वायुपुत्र (वायुतत्त्वातून निर्माण झालेला) मारुति हा सूर्याला (तेजतत्त्वाला) जिंकणारा होता हे लक्षात येते. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या तत्त्वांत वायुतत्त्व हे तेजतत्त्वापेक्षा जास्त सूक्ष्म, म्हणजे जास्त शक्तिमान आहे.

भक्त : दास्यभक्तीचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणून अजूनही मारुतीच्या रामभक्तीचेच उदाहरण देतात. आपल्या प्रभूंकरिता प्राणार्पण करण्यासाठी तो सदैव तयार असे. त्यांच्या सेवेपुढे त्याला शिवतत्व व ब्रह्मत्व यांची इच्छाही कवडीमोल वाटत असे. हनुमान म्हणजे सेवक व सैनिक यांचे मिश्रण होय !

बुद्धिमान : व्याकरणसूत्रे, सूत्रवृत्ति, वार्तिक, भाष्य आणि संग्रह यांत मारुतीची बरोबरी करणारा कोणी नव्हता (उत्तररामचरित ३६.४४-४६).



मारुतीला अकरावा व्याकरणकार मानतात.

मानसशास्त्रात निपुण व राजकारणपटु : अनेक प्रसंगी सुग्रीवादि वानरच काय, पण रामानेही याचा सल्ला मानला आहे. रावणाला सोडून आलेल्या बिभीषणाला आपल्या पक्षात घेऊ नये, असे इतर सेनानींचे मत असता, मारुतीने 'त्याला घ्यावे' असे सांगितले व रामाने ते मान्य केले. लंकेत सीतेच्या प्रथम भेटीच्या वेळी तिच्या मनात स्वतःबद्दल विश्वास निर्माण करणे, शत्रुपक्षाला नामोहरम करण्यासाठी लंकादहन करणे, रामाच्या आगमनाबद्दल भरताला काय वाटते ते पहाण्यासाठी रामाने त्यालाच पाठविणे, यावरून त्याची बुद्धिमत्ता व मानसशास्त्रातील निपुणता दिसून येते. लंकादहनानेही त्याने रावणाच्या प्रजेचा रावणाच्या सामर्थ्यावरील विश्वास डळमळीत केला.

जितेंद्रिय : सीतेच्या शोधासाठी रावणाच्या अंतःपुरात गेलेल्या मारुतीची मनःस्थिति ही त्याच्या उच्च चारित्र्याची निदर्शक आहे. त्या वेळी तो स्वगत म्हणतो, 'निःशंकपणे पडलेल्या या सर्व रावणस्त्रिया मी ह्या अशा पाहिल्या खऱ्या; परंतु त्या पहाण्यामुळे माझ्या मनामध्ये विकार उत्पन्न झाला नाही.' – वाल्मीकिरामायण, सुंदरकांड ११.४२-४३.

अनेक संतांनीही या जितेंद्रिय अशा हनुमंताची पूजा बांधून त्याचा आदर्श समाजापुढे ठेवला. इंद्रियजित असल्यामुळेच मारुति इंद्रजितालासुद्धा हरवू शकला.

साहित्य, तत्त्वज्ञान व वक्तृत्वकला यांत प्रवीण : रावणाच्या दरबारातील त्याचे भाषण हा वक्तृत्वकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. संगीतशास्त्राचा प्रवर्तक : मारुतीला संगीतशास्त्राचा एक प्रमुख प्रवर्तक मानलेले आहे. समर्थ रामदासस्वामींनी त्याला 'संगीतज्ञानमहंता' असे संबोधले आहे.

चिरंजीव : दर वेळी प्रभु श्रीराम अवतार घेतात तेव्हा ते तेच असतात, मात्र मारुति दर अवतारी निराळा असतो. मारुति सप्तचिरंजीवांपैकी एक असला, तरी सप्तचिरंजीव चार युगांचा शेवट झाला की मोक्षाला जातात व त्यांची जागा अतिशय उन्नत असे सात जण घेतात.

**२. मूर्तिविज्ञान**

अ. दासमारुति व वीरमारुति : हनुमानाची दासमारुति व वीरमारुति ही दोन रूपे आहेत. दासमारुति हा रामापुढे हात जोडून उभा असतो. त्याची शेपटी जमिनीवर रुळलेली असते. वीरमारुति युद्धाच्या पवित्र्यात असतो. त्याची शेपटी वर उभारलेली व उजवा हात मस्तकाकडे वळलेला असतो. आ. पंचमुखी मारुति : पंचमुखी मारुतीच्या मूर्ती बऱ्याच प्रमाणात आढळून येतात. गरुड, वराह, हयग्रीव, सिंह व कपिमुख ही ती पाच मुखे होत. या दशभुज-मूर्तींच्या हातात ध्वज, खड्ग, पाश इत्यादि आयुधे असतात. पंचमुखी देवतांचा एक अर्थ असा आहे की, पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार व उर्ध्वदिशा अशा पाचही दिशांना त्या देवतेचे लक्ष आहे किंवा तिचे त्यांच्यावर स्वामित्व आहे. इ. दक्षिणमुखी मारुति : दक्षिण शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. एक म्हणजे दक्षिण दिशा व दुसरा म्हणजे उजवी बाजू. गणपति व मारुति यांची सुषुम्नानाडी नेहमी चालू असते; पण रूप बदलल्यावर थोडा बदल होऊन त्यांची सूर्य किंवा चंद्र नाडीही थोड्या प्रमाणात चालू होते. ३. शनीची साडेसाती व मारुतीची पूजा : शनीची साडेसाती असतांना तिचा त्रास कमी व्हावा म्हणून मारुतीची पूजा करतात.

**संदर्भ : सनातन संस्थेचा लघुग्रंथ 'मारुति' संकलन – राहुल कोल्हापुरे संपर्क – ९८५०९०७४८३**

# जय श्रीराम ..च्या घोषात रामनवमी उत्साहात जिल्ह्यात साजरी



सातारा : प्रतिवर्षाप्रमाणे चैत्रशुद्ध नवमीला मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री रामचंद्र यांची जन्म तिथि अर्थात जयंती ..जय श्रीराम.. जय श्रीराम.. च्या घोषणा देत सतारा जिल्ह्यात रविवारी मोठ्या उत्साहात व विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यापासून सुरू असलेल्या नऊ दिवसाच्या श्रीराम नवरात्री उत्सवाची सांगत आहे आज रामनवमीला सातारा शहरातील विविध मंदिरात साजरी झाली.

सातारा येथे श्रीकृष्ण यजुर्वेद पाठशाळेत सुरू असलेल्या नऊ दिवसीय श्री राम महा यज्ञाची सांगत आज दुपारी रामनवमीला पूर्णाहूतीने वेदमूर्ती विवेक शास्त्री गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आल्यानंतर जन्म काळाचे किर्तन सादर करण्यात आले. त्यानंतर पारंपारिक नऊवारी साडीतील महिलांनी पाळण्यात ठेवलेल्या श्रीरामाला जोजवून अंगाई गीते म्हटली सायंकाळी यज्ञस्थळापासून सातारा शहरात भव्य शोभायात्रा काढून रामभक्त आणि आनंद लुटला . दरम्यान सातारा शहरातील मंगळवार पेठ येथील श्री काळाराम मंदिर प्रतापगंज पेठेतील श्रीगोरा राम मंदिर, शनिवार पेठ येथील श्री शहाराम मंदिर ,समर्थ मंदिर परिसरातील श्री दामले राम मंदिर तसेच शाहूपुरी गेंडामाळ येथील पाटील परिवाराच्या श्री शांत राम अर्थात राम ध्यान मंदिरातही राम जन्मा निमित्त विशेष फुलांची सजावट तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजित आयोजन करण्यात आले होते. दुपारी बारा वाजता मंदिरांमध्ये गुलाल व पुष्पवृष्टी करून श्रीरामाचा जन्मोत्सव महिलांनी पाळण्यामध्ये श्रीफळ रुपी श्रीरामाला जोजवून पाळणा गीते म्हणून साजरा केला .यावेळी श्री राम जय राम जय जय राम चा जय जयकार करून रामभक्तांनी विशेष आनंद लुटला. त्यानंतर महाआरती झाल्यावर सुंठवडा व प्रसाद वितरण करण्यात आला.

शहरातील प्रतापगंजपेठेतील श्री गोराराम मंदिरात रामभक्तांनी पंचधातूच्या राममूर्तीची मंदिर परिसरात पालखीतून मिरवणूक काढून आनंद लुटला तसेच येथे दरवर्षीप्रमाणे रामनवमीला आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात शेकडो युवक युवतींनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमही मोठ्या उत्साहात संपन्न केला. सातारा जिल्ह्यातील श्री क्षेत्र सज्जनगड येथे रामनवमी निमित्त विशेष पूजा तसेच पवमान पंचसूक्तचा अभिषेक श्रीराम मूर्तीला घालण्यात आला .समर्थ रामदास स्वामींचा जन्म श्री राम नवमीला झाल्याने सज्जनगड येथील मंदिरात जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

रामनामाची महती संपूर्ण जगाला पटवून देणाऱ्या श्रीक्षेत्र गोंदवले येथील ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर संस्थांनमध्येही रामनवमीचा विशेष उत्साह दिसून येत होता .गोंदावले येथील श्री थोरले राम मंदिर व धाकटे राम मंदिरात विशेष सजावट करण्यात आली होती . थोरले राम मंदिरात सुवासिक गजर्यांनी संपूर्ण गाभारा सुशोभित करण्यात आला होता. ही लक्षवेधी आकर्षक सजावट पाहण्यासाठी रात्री उशिरापर्यंत रामभक्तांनी गर्दी केली होती.

दुपारी जन्म काळाचे किर्तन झाल्यावर उपस्थित हजारो भक्तांनी रामनामाचा जयघोष करत गुलाल, फुले उधळली. अनेक मंदिरातून यानिमित्त महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते . सातारा जिल्ह्यातील फलटण येथील नाईक निंबाळकर यांच्या राजघराण्याच्या श्रीराम मंदिरातही भव्य श्रीराम जन्मोत्सव साजरा करून गुलालाची उधळण करण्यात आली .

# आंतरराष्ट्रीय अल्ट्रा रनर आशिष कासोदेकर उलगडणार धावपटू जीवनाचा प्रवास

## शनिवारी कराड रोटरी अवॉर्ड सोहळ्याचे आयोजन

कराड : रोटरी क्लब कराड आयोजित कराड रोटरी अवॉर्ड निमित्त शनिवार, दि.१२ रोजी यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन (टाऊनहॉल) येथे सायंकाळी ५.३० वाजता होणाऱ्या सोहळ्यात गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड फेम, आंतरराष्ट्रीय अल्ट्रा रनर आशिष कासोदेकर हे आपल्या धावपटू जीवनाचा प्रवास उलगडणार असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ कराड अध्यक्ष रो.रामचंद्र लाखोले व सचिव रो.आनंदा थोरात यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ कराड यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कराड रोटरी अवॉर्ड आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास कराड अर्बन बँकेचे चेअरमन डॉ. सुभाषराव एरम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी आंतरराष्ट्रीय अल्ट्रा रनर आशिष कासोदेकर यांचा विशेष सन्मान होणार आहे.

या रोटरी क्लब ऑफ कराडतर्फे होणाऱ्या प्रेरणादायी



व्होकेशनल अवॉर्ड गौरव समारंभात आंतरराष्ट्रीय अल्ट्रा रनर आशिष कासोदेकर यांचा गौरव झाल्यानंतर मराठी माणसाची आंतरराष्ट्रीय धाव समजून घेता येणार आहे. मॅरेथॉन मध्ये त्यांची विशेष कामगिरी आहे. सलग ६० दिवसांत ६० मॅरेथॉन – गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड, लडाख ५५५ किमी – ५ दिवसांत, ब्राझील २१७ किमी – ४४ तासांत, केरळ ते लडाख – ४००५ किमी (७६ दिवसांत), माउंट एव्हरेस्ट ६० किमी मॅरेथॉन अशा अनेक थक्क करणाऱ्या कामगिरीचा साक्षात प्रेरणादायी प्रवास ऐकता येणार आहे.या कार्यक्रमात कराड रोटरी अवॉर्ड पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

यामध्ये उद्योग क्षेत्रात किशोर कुंभार, क्रीडा क्षेत्रातील राजवर्धन पाटील, पर्यावरण क्षेत्रातील इंद्रजीत निकम, सामाजिक कार्य क्षेत्रात शिवाजी डुबल (राजमाची), सामाजिक संस्था क्षेत्रात आपले कराड ग्रुप, अभिनय क्षेत्रातील आदित्य भोसले (गोवारे), कृषी क्षेत्रातील कृष्णतराव गुरव (घारेवाडी), कला क्षेत्रात बाबा पवार (विंग) यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या सन्मान सोहळ्यास सर्वांनी आणि विशेषतः खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ कराड यांच्या वतीने व्होकेशनल डायरेक्टर रो.अभय नांगरे यांनी केले आहे.

# चाळीसगावच्या मिरची बाजाराला आग

जळगाव : जळगावच्या चाळीसगाव शहरातील मिरची बाजाराला मोठ्या प्रमाणात आग लागली आहे. आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धुराचे लोट पसरले आहेत. या बाजाराच्या बाजूलाच पेट्रोलपंप असल्याने एकच धावपळ उडाली. या आगीत बाजाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



चाळीसगाव शहरातील नागद रोडवर मिरची बाजार आहे. या मिरची बाजाराला आज दुपारी भीषण आग लागली. मिरची बाजारात मोठ्या प्रमाणात मिरची आणि इतर शेतमालाचा साठा होता. जो या आगीत जळून खाक झाला असण्याची शक्यता आहे. या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. तसेच या आगीत एक ट्रक देखील जळून खाक झाला असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

दरम्यान आग लागलेल्या घटनाशेजारीच पेट्रोल पंप असल्याने परिसरात एकच धावपळ उडाली आहे. अग्निशामक दलाचे जवान आग विझवण्यासाठी युद्धपातळीवर काम करत सुरू आहे. सुदैवाने यात कोणतीही जिवित हानी झालेली नाही. मात्र, आगीमुळे व्यापारी आणि शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पोलिस प्रशासन देखील घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मदत करत आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन – ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा – ४१५११० येथून प्रकाशित केले. ✲ संपादक – गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारणीसाठी दहा कोटी निधी

## माजी आमदार मानसिंगराव नाईक यांची पत्रकार बैठकीत माहिती

शिराळा : शिराळा येथील भुईकोट किल्ल्यावरील छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले स्मृतीस्थळ विकसित करणे साठी शासनाने एकूण २४ कोटीच्या प्रस्तावा पैकी दहा कोटी रुपयांचा निधी सांगलीच्या जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग केला असून लवकरच या ठिकाणी भव्य दिव्य स्मारक उभारणीच्या कामाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती माजी आमदार मानसिंगराव नाईक यांनी पत्रकार बैठकीत दिली.



नाईक म्हणाले, माझ्या विधानसभेच्या कार्यकाळात जिल्हाधिकारी यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये जिल्हास्तरीय समितीकडून शासनास २०.०० कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. नाईक पुढे म्हणाले, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या समवेत झालेल्या बैठकीनुसार दादांनी शासनाच्या शिखर समितीची दिनांक ०४/०६/२०२४ रोजी घेणेत आली. सदर बैठकीमध्ये पहिल्या टप्प्यात १३ कोटी ४६ लाख ३९ हजार ६६४ रक्कमेच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळाली. स्मृतीस्थळ विकास आराखड्या अंतर्गत समाविष्ठ काम ांकरिता सन २०२४-२५ साठी ९ कोटी ८५ लाख ८२ हजार इतका निधी वितरीत केला आहे. शेवटी नाईक म्हणाले, नगरपंचायतीच्या ताब्यात असलेल्या ००.७५ आर इतक्या जागेवर लवकरच काम सुरु करण्यात येणार. छत्रपती संभाजी महाराज प्रेमी असणाऱ्या युवकांना प्रेरणा देणारे स्मारक या ठिकाणी साकारले जाणार आहे.

# कराड 'मर्चंट'चा ८७१ कोटींचा एकत्रित व्यवसाय संस्थेने ५०१ कोटींच्या ठेवींचा टप्पा पुर्ण केला चेअरमन माणिकराव पाटील

कराड (लक्ष्मीपुत्र) - कराड मर्चंट सहकारी क्रेडिट संस्थेने नुकत्याच संपलेल्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात गत वर्षीच्या तुलनेत ठेवींमध्ये १० टक्के व कर्जात १६ टक्के ऐवढी प्रशंसनीय वाढ केली आहे. तसेच संस्थेचा एकत्रित व्यवसाय ८७१ कोटी झाला असून संस्थेने ५०१ कोटींच्या ठेवींचा टप्पा पुर्ण केला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन माणिकराव पाटील यांनी दिली.

चेअरमन माणिकराव पाटील म्हणाले, यावर्षी संस्थेने सर्व सभासदांच्या सहकार्याने संस्थेची गुणात्मक वाढ करीत संस्थेकडे ३६२ कोटींची कर्जे वितरीत केली असून गत वर्षीच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात चांगली वसुली झाल्याने ढोबळ एनपीए ९.३२ टक्के कमी करण्यात यश मिळविले आहे. सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या अढळ विश्वा विश्वासामुळे संस्थेच्या ठेवी ५०१ कोटींवर पोहचल्या आहेत.

संस्थेच्या नफ्यामध्ये २७ टक्याने वाढ होवून एकूण १७ कोटी १७ लाखांचा ढोबळ नफा झाला आहे. सर्व तरतुदी वजा करता निव्वळ नफा ८ कोटी ७० लाख इतका झाला आहे. संस्थेने विविध बँकेत ३०० कोटींची गुंतवणुक केली असून निव्वळ एनपीएही शुन्य टक्के ठेवण्यात यश मिळविले असल्याचे चेअरमन माणिकराव पाटील यांनी सांगितले.

संस्थेचे काम काज विविध २७ शाखांतून सुरु असून १८ शाखा स्वमालकीच्या जागेत कार्यरत असल्याचे सांगताना संस्थेचे चेअरमन श्री. पाटील म्हणाले, बँकीग क्षेत्रात वेगवेगळ्या नवनवीन इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी, लॉकर आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून संपुर्ण शाखा सीबीएस प्रणालीचा अवलंब करीत आहे. त्याचाही सर्व ग्राहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे अवाहनही चेअरमन माणिकराव पाटील यांनी केले.



चालू आर्थिक वर्षात नेहमीप्रमाणे मर्चेंट समुहाने आपली सामाजिक बांधिलकीचे भान जपत उपविभागीय कार्यालय, कराड येथे येणाऱ्या लोकांना बसण्यासाठी एअरपोर्ट बाकडी व दैनंदिन वापराच्या वस्तू दिल्या आहेत. मर्चेंट समुहाकडून भगवान महावीर गोरक्षण ट्रस्ट मौजे वाघेरी (ता. कराड) यांना गोसंगोपनासाठी १० लाख रुपयांची देणगी दिली असल्याचे चेअरमन माणिकराव पाटील यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन शिवाजीराव जगताप व संचालक, सभासद, कर्जदारांनी केलेले सहकार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत सर्व ग्राहकांचे आणि सर्व सेवकांनी उल्लेखनीय काम केल्याबद्दल त्यांचेही चेअरमन माणिकराव पाटील यांनी आभार मानले.

# रोहान दुबंल याने संपूर्ण रोजे पूर्ण केले

नागोठणे (याकुब सय्यद) : नागोठणे येथील कु. रोहान इम्रान दुबंल वय वर्षे ०९ या लहानशा मुलाने पवित्र रमजान महिन्याचे २९ रोजे पूर्ण केले ह्यावर्षी उन्हाचा तापमान तसेच उष्णता पाहिले असता पाणी पासून तहानलेला माणूस पाणी पासून जगू शकत नाही अशा तापमानाच्या वेळेत यावर्षी रमजान महिन्याचे क (रोजा) उपवास लहान मुलाने पकडणे ही एक मुलाची इच्छाशक्ती पाहिले असता ही बाब कौतुकास्पद आहे.



इस्लाम धर्मामध्ये लहान मुलांचे वय सात वर्ष झाले की रमजान महिन्याचे कठीण रोजे पकडणे त्याच्यावर बंधन कारक आहेत या लहान वयात मुलांनी रोजे पकडणे (अल्लाह) ईश्वर ह्याला आपल्याकडे आकर्षित व प्रसन्न करून घेणे आहे.

इस्लाम धर्मामध्ये असलेले पवित्र रमजान महिन्याचे बंधन नियमांचे पालन करीत यावर्षीच्या सर्व रमजान महिन्याचे पवित्र रोजा कु. रोहान इम्रान दुबंल या नव वर्ष वयाच्या मुलाने संपूर्ण २९ रोजे पूर्ण केल्याने त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुक होत असून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.

# जनकल्याण पतसंस्था कराडची भक्कम आर्थिक स्थिती-चंद्रशेखर देशपांडे

कराड : जनकल्याण नागरिक सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्षात व्यवसायाचा चढता आलेख कायम ठेवण्यात यश मिळविले आहे. आर्थिक वर्षाअखेर रु.९३८ कोटींच्या संमिश्र व्यवसाय केला आहे. एकुण व्यवसायात रु.२५ कोटीने वृध्दी झाली आहे. मार्च अखेर रक्कम रु.५५७ कोटींच्या ठेवी जमा झाल्या असून ३८१ कोटी कर्ज वितरण केले आहे. विविध बँकामधून रु.२५३ कोटीची सुरक्षित गुंतवणूक केली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर देशपांडे यांनी दिली.

व्यावसायिक तीव्र स्पर्धे तही बाजारपेठेतील सकारात्मक हालचालींचा संस्थेच्या काम काजात नियोजनबध्द उपयोग करुन, तसेच प्रभावी कर्ज वसूली या जोरावर संस्थेचा नक्त एन.पी.ए ३.९६ टक्के इतका आहे. संस्थेस संपलेल्या आर्थिक वर्षात रु.७.७० कोटींचा नक्त नफा झाला आहे. सदर नफ्यात आर्थिक वर्ष २०२३-२४ पेक्षा निश्चित वाढ झालेली आहे.

संस्थेने सभासदांसाठी अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित विविध सेवा सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. यामध्ये युटिलिटी पेमेंटस्, फास्टॅग, क्यू. आर.कोड, टॅक्स पेमेंट कलेक्शन याचबरोबर आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी, प्रीपेड डेबीट कार्डचा समावेश होतो. या सुविधांचा संस्थेच्या सभासदांना मोठ्या प्रमाणावर लाभ होत आहे. संस्थेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग सुविधा सुध्दा उपलब्ध करुन दिली आहे. विमा व्यवसायामधील संस्थांबरोबर व्यावसायिक करार करुन जनरल इन्शुरन्स अंतर्गत वाहन, फायर, मरीन, इंडस्ट्रीअल व हेल्थ इन्शुरन्स व लाईफ इन्शुरन्स अंतर्गत टर्म इन्शुरन्सचा संस्था व्यवसाय करत आहे. या व्यवसायांतर्गत असलेल्या योजनांचा संस्थेच्या अनेक सभासदांनी लाभ घेतलेला आहे व समाधान व्यक्त केले आहे.

संस्थेने नियमित कर्ज परतफेड करणा-या कर्जदारांना सलग बारा वर्षे प्रोत्साहनपर व्याजदरात १ टक्का पर्यंत या प्रमाणे रु.८ कोटी इतका रिबेट दिलेला आहे. त्याचा नियमित कर्जदारांना निश्चितच लाभ झालेला आहे. सन २०२४-२५ या संपलेल्या आर्थिक वर्षात नियमित कर्ज भरणा-या कर्जदारांच्या रिबेटची रक्कम लवकरच त्यांच्या सेव्हिंग्ज, चालू खाती जमा होईल. रिबेट देण्याचे संचालक मंडळाचे हे धोरण पुढे ही सातत्याने ठेवले जाईल. २०२५-२६ यावर्षी देखील आपली कर्ज खाती नियमित ठेवून रिबेट योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष श्री.अभिजीत चाफेकर यांनी यावेळी केले.

आर्थिक वर्ष २०२५-२६ हे अजूनही आव्हानात्मक असणार आहे, याची संस्थेच्या संचालक मंडळास जाणीव असून या आव्हानांचा सक्षमपणे सामना करणेस जनकल्याण पतसंस्था सिध्द असल्याचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर देशपांडे यांनी सांगीतले. मागील वर्षामध्ये संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेतल्याबद्दल व संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्व सभासदांचे अध्यक्षांनी आभार मानले. चालु आर्थिक वर्षाकरिता संस्थेने रु.१००० कोटी व्यवसायाचे उध्दिष्ट ठेवले आहे. ते लवकरात लवकर पूर्ण होणेकरीता सर्व सभासदांनी संस्थेशी जास्तीत जास्त व्यवहार करुन संस्थेस सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री अभिजीत चाफेकर, संचालक डॉ.प्रकाश सप्रे, डॉ.अविनाश गरगटे, सीए शिरीष गोडबोले, श्री.एकनाथ फिरंगे, श्री.जितेंद्र शहा, श्री.हिंदुराव डुबल, श्री.मोहन सर्वगोड, डॉ.सुचिता हुद्देदार, सौ.वर्षा कुलकर्णी, श्री दिपक जोशी, श्री प्रविण देशपांडे, श्री सुनील कुलकर्णी, सीए. आशुतोष गोडबोले, श्री. अशोक आटकर व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विनायक फडके हे उपस्थित होते.

# कराड येथे लिंगायत समाज वधू-वर पालक परिचय मेळावा

कराड : राष्ट्रीय लिंगायत संघ व कराड तालुका लिंगायत समाज यांच्या वतीने शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी कराड येथे भव्य लिंगायत समाज वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राजीव खलीपे व नंदाताई विभूते यांनी दिली.

शुक्रवार दि १८ एप्रिल रोजी सकाळी ११ते दुपारी ४ या वेळेत यशवंतराव चव्हाण स्मृति सदन येथे हा मेळावा होणार आहे. मेळाव्याचे उदघाटन बेंगलोर येथील चन्नबसवानंद महास्वामी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मायणी अर्बन बँकेचे अध्यक्ष सुरेंद्र गुदगे, महाराष्ट्र राज्य ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट संघटनेचे अध्यक्ष प्रकाश गवळी, राष्ट्रीय लिंगायत संघाचे अध्यक्ष प्रदीप वाले आदींची उपस्थिती राहणार आहे.

दरम्यान या कार्यक्रमात सातारा जिल्ह्यातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. समाजबांधवांनी सुनील महाजन (७४९९०७१५३६) व शिवानंद डुबल ( ९४२२०३००३८) यांच्याकडे नावे सुचवावीत. मेळाव्याला पश्चिम महाराष्ट्रातून वधू वर व त्यांचे पालक उपस्थित राहणार आहेत. गरजूंनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संजय शेटे व साधना राजमाने यांनी केले आहे.

# सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय महात्मा फुले स्मारक व्याख्यानमाला संपन्न

कराड - येथील रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त मा. प्रो. डॉ. भारती पाटील समन्वयक, शारदाबाई पवार अध्यासन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे विद्रोहाची परंपरा, महात्मा ते महात्मा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने हे होते. प्रा. डॉ. भारती पाटील आपल्या भाषणात म्हणाल्या की, बाराव्या शतकापासून अध्यात्मिक पातळीवर समतेचा विचार संत परंपरेने मांडला पुढे सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी विद्रोही परंपरा पुढे



नेतात. सतराव्या शतकात महात्मा फुलेंनी कुलवाडी भूषण असे छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन केले. शिवमहोत्सव सुरू केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वरती पाहिला पोवाडा लिहिला. स्त्रीमुक्तीसाठी व स्त्री शोषण व जातीव्यवस्थेच्या अंतासाठी जीवनाच्या अंतींम क्षणापर्यंत त्यांनी लढा दिला. समाज जागृतीसाठी तृतीयरत्न हे नाटक लिहिले. ब्राह्मणाचे कसब, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, समग्र फुले इ. ग्रंथाची निर्मिती करून समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे काम केले. इथल्या जाती व्यवस्थेने सामान्य माणसाला दास बनवले होते. जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था विरुद्ध प्रामुख्याने त्यांनी वैचारिक मांडणी केली. शैक्षणिक कार्यामध्ये रात्र शाळा काढल्या १८५३ ते १८५५ या काळात १८२ मुली शिकवल्या मुक्ता साळवे ही महात्मा फुले यांच्या रात्र शाळेतील शिकणारी विद्यार्थिनी आहे १८८२ ला हंटर कमिशन समोर प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करावे अशी मागणी केली. स्त्री-पुरुषातील मतभेदाची दरी कमी केली. बालविवाहाला विरोध केला, विधवांच्या समस्या च्या वरती मौलिक विचार मांडले विधवा पुनर्विवाह बालप्रतिबंधक ग्रहाची स्थापना केली. केशवपण प्रथा बंद केली महात्मा फुलेंनी जे शिक्षण दिले त्या माणसाला माणूस बनवणारे, विवेकी, सदाचारी, सत्यधर्म, परस्त्रीचा सन्मान करणारे होते.

प्रास्ताविक स्वागत व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी करून दिला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. रमेश पोळ, प्रा. डॉ. सुनंदा पिसाळ, प्रा. अनिता साळुंखे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. दिलीप कुमार कसबे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्पना पाटील यांनी केले.

# नातं रक्ताच परिवाराच्या वर्धापन दिन

## इस्लामपुरात काव्य मैफिलीचे आयोजन

इस्लामपूर : गेले चार वर्षे रक्तदान क्षेत्रात काम करणाऱ्या, त्यासोबत कोविड काळात अनेकांच्या सोबत उभे राहिलेल्या, दुर्गाभ्यास गडसंवर्धन, निसर्ग संवर्धन, मराठी शाळा वाचवा, विद्यार्थी प्रशिक्षण, अक्षरवारी फिरते वाचनालय, गोष्ट पोटापाण्याची उद्योजक प्रशिक्षण शिबिर, मासिक पाळी वरती सारं काही तिच्यासाठी ही कार्यशाळा घेणारे, युवा संमेलनाच्या माध्यमातून युवकांना एकत्र करणारे, दरवर्षी सुरू असलेल्या आषाढी वारीच्या निमित्ताने वारीत आरोग्य कॅम्प घेणारे, युवकांना बोलत करण्यासाठी महिन्याला परिसंवाद असे वेगवेगळे उपक्रम घेणाऱ्या या नातं रक्ताच परिवार या संस्थेचा वर्धापनदिन रविवारी दि १३ एप्रील रोजी सकाळी १०.३० वाजता किसाननगर इस्लामपूर मधील डी के सेलिब्रेशन हॉलमध्ये आयोजित केला आहे.




या मैफिलीसाठी दंगलकार कवी नितीन चंदनशिवे कवठेमंकाळ, कवी रमजान मुल्ला नागठाणे, कवी श्रीकांत मेडसींगे कराड हे यात सहभागी असतील. तरी इस्लामपूर परिसरातील श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा. असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अभिवादन

नवी मुंबई : महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती कोंकण भवन येथे उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.




महात्मा फुले हे भारतातील थोर समाजसुधारक, शिक्षणप्रणेते आणि स्त्री-शूद्र उद्धारक होते. त्यांनी सावित्रीबाई फुलेंच्या मदतीने देशात पहिली मुलींची शाळा सुरू केली. 'सत्यशोधक समाज' स्थापून त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध प्रभावी चळवळ उभारली. जातीभेद, अंधश्रद्धा, स्त्री-पुरुषातील विषमता आणि धार्मिक रूढींविरुद्ध लढा दिला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी विधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. स्त्रियांसाठी आश्रयगृह (स्त्री आत्मसुरक्षा केंद्र) सुरू केले. महात्मा ज्योतिबा फुले हे सामाजिक समतेचे, शिक्षणाचे आणि सत्यशोधक विचारांचे प्रतीक होते. त्यांचा वारसा आजही प्रेरणादायी आहे.

# राजधानीत महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

नवी दिल्ली : भारतात स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे थोर समाज सुधारक व क्रांतिकारक विचारवंत महात्मा जोतीबा फुले यांची जयंती उभय महाराष्ट्र सदन येथे आज साजरी करण्यात आली.

कस्तुरबा गांधी मार्गस्थित महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणातील महात्मा फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याजवळ तसेच कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव आर.विमला यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र परिचय केंद्रात आज महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माहिती अधिकारी अंजु निमसरकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. उपस्थितीत कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



# शिराळा येथे ११ मारुती पैकी वीर हनुमान मंदिर

शिराळा : शिराळा येथे ११ मारुती पैकी एक समर्थ राम दास स्वामी स्थापित वीर हनुमान मंदिर आहे. शके १५७६ सन १६५५ ला म्हणजे सुमारे ३६८ वर्षा पूर्वी या मंदिराची उभारणी समर्थ रामदास स्वामी यांनी केली आहे. ही मूर्ती चुनखडी,शाडू,गोमुत्र, गाईचे शेण यापासून बनवलेली आहे. उद्या हनुमान जयंती असल्याने येथे कीर्तन,दासबोध,जन्म काळ,महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शिराळा येथील महादजी देशपांडे हे समर्थ रामदासस्वामी यांचे शिष्य होते.

त्यांच्या आग्रहास्तव रामदास स्वामिंनी येथे हनुमान मंदिराची उभारणी केली आहे. या मंदिर स्थापनेवेळी रामदास स्वामी शिराळा येथील मनोहर बुवा हसबनीस यांच्या घरी वास्तव्यास होते. हे मंदिर पूर्णतः दगडात आहे. हनुमान मूर्तीच्या चेहऱ्या जवळ दोन्ही बाजूला दोन झरोके आहेत. त्यामुळे सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी सूर्यकिरणे हनुमानाच्या चेहऱ्यावर येतात. सतत मूर्तीच्या गाभाऱ्यात झरोक्यामुळे खेळता वारा असतो.

मंदिर पूर्ण झाल्या नंतर रामदास स्वामीचे शिष्य महादजी देशपांडे हे हनुमानाची सेवा करू लागले .त्यांतर आता त्यांचे वंशज विनय देशपांडे, जयंत देशपांडे, उद्धव देशपांडे, पांडुरंग देशपांडे, नारायण देशपांडे ,राहुल देशपांडे,धनंजय देशपांडे, यशोधन देशपांडे, विक्रांत देशपांडे हे प्रत्येक वर्षी पूजा करत आहेत. मंदिर बांधकाम पूर्ण होताच रामदास स्वामी निघून गेले. जाताना त्यांनी हसबनीस यांना रामपंचायतन(पटाधीश राम) ही मूर्ती भेट दिली आहे. या मूर्तीमध्ये राम असून त्यांच्या मांडीवर सीता बसलेली आहे. एका बाजूला भरत आणि दुसऱ्या



बाजूला शत्रूघन आहेत. ते राम ला चौऱ्या घालत आहेत. सम र उजवीकडे मारुती व डावीकडे लक्ष्मण उभे आहेत अशी मूर्ती आहे. त्या मूर्ती सोबत दासबोध व कुबडी भेट दिली आहेत.

रामदास स्वामींची जुनी वस्त्रे ही हसबनीस यांच्याकडे अजून आहेत. या दास बोधाची मूळ प्रत ही धुळे येथील श्री समर्थ वाग्देवता मंदिर येथील कार्यालयास हणमंत हसबनीस यांनी ३१ मे १९९८ ला भेट दिला आहे. त्याचा उपयोग पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थांना होत आहे. त्याची झेरॉक्स प्रत शिराळा येथे उपलब्ध आहे. रामनवमीला बापूसाहेब हसबनीस यांच्या घरी मोठ्या प्रमाणात राम जन्मकाळ सोहळा साजरा करतात. राम जन्मकाळ साजरा झाल्यानंतर लगेच राम व हनुमान यांची भेट होऊन मंदिरात आरती केली जाते. त्यानंतर हा सोहळा संपन्न होते. हनुमान जयंतीला हनुमान जन्म सोहळ्या नंतर राम व हनुमान यांची भेट होते .त्यानंतर कीर्तन समाप्ती नंतर हा जन्म सोहळा संपन्न होतो. रामनवमी व हनुमान जयंती ला राम आणि हनुमान यांची भेट झाल्या शिवाय दोन्ही कार्यक्रम संपन्न होत नाहीत.

# रयत सेवक बँकेस १४.९४ कोटी निव्वळ नफा

## २६४० कोटींचा एकत्रित व्यवसाय

कराड - पगारदार नोकरांच्या सहकारी बँकांमध्ये अग्रेसर असणाऱ्या सातारा येथील दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा या बँकेची स्थापना पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दि. १६/०८/१९४० रोजी रयत शिक्षण संस्थेतील सेवकांचे आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने केली.

रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक कार्य महाराष्ट्रातील १४ व कर्नाटकातील १ अशा १५ जिल्हयांमध्ये विस्तारलेले आहे. त्यानुसार बँकेचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्रभर विस्तारलेले आहे. बँकेने विविध कर्ज योजना, कमीत कमी एन.पी.ए., ठेवी व कर्जे यामध्ये लक्षणीय वाढ, उत्कृष्ट निधी नियोजन, अद्ययावत संगणक प्रणालीचा अवलंब, संचालक मंडळाने घेतलेले धोरणात्मक निर्णय व सभासदांचे जास्तीत जास्त हित जोपासून बँकेच्या नफ्यात प्रत्येक वर्षी वाढ झालेने बँकेस सतत ऑडिट वर्ग 'अ' मिळालेला आहे. बँकेने सभासद व ठेवीदार यांच्या विश्वासास पात्र राहून सन् २०२४-२५ मध्ये रू. १४ कोटी ९४ लाख इतका निव्वळ नफा मिळविलेला आहे.

बँकेच्या माहे मार्च २०२५ अखेर रु. १५९५ कोटी ६४ लाख इतक्या ठेवी असून बँकेमार्फत रू. १०४४ कोटी ७५ लाख इतके कर्जवाटप करण्यात आलेले आहे.

बँकेचा एकूण व्यवसाय रू. २६४० कोटींचा आहे. बँकेने माहे मार्च २०२५ अखेर रू. ७०८ कोटी ०३ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. बँकेचे भागभांडवल रू. ७७ कोटी ७४ लाख इतके असून बँकेने कर्ज वसुली धोरण प्रभावीपणे राबवून ढोबळ एन.पी.ए. केवळ ०.७९% इतका ठेऊन निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.०% राखण्यात यश मिळविलेले आहे.

तसेच बँकेने मोबाईल बँकिंग, RTGS/NEFT, ATM, POS, E-COM यासारख्या सुविधा दिलेल्या असून लवकरच QR Code /UPI ही सुविधाही सभासदांना उपलब्ध करून देणेत येणार असलेची माहिती बँकेचे चेअरमन व नंदकिशोर गायकवाड यांनी दिली.

यावेळी बँकेचे संचालक डॉ. धनंजय कच्छवे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भास्कर कणसे, जनरल मॅनेजर विलास मांडवेकर, असि. जन. मॅनेजर दत्तात्रय काकडे तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

बँकेच्या उत्तम चाललेल्या कारभाराबद्दल व उत्कृष्ठ नियोजनाबद्दल बँकेचे चेअरमन आणि सर्व संचालक मंडळ तसेच बँकेचे अधिकारी व सेवक वर्गाचे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी (माजी IS), संस्थेचे सचिव आणि बँकेचे एक्स ऑफिसिओ विकास देशमुख (माजी IS) व संस्थेचे सह-सचिव माध्य. विभाग व उच्च माध्य. विभाग यांनी अभिनंदन केले.

# रखडवलेल्या जलजीवन योजनेबाबत मसूरकरांचा १७ रोजी रास्ता रोको

मसूर : कराड तालुक्यातील मसूर येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण शाखा कराड यांच्यावतीने सुरू असलेले जलजीवन पाणी योजनेचे काम अधिकारी आणि ठेकेदार यांच्या मनमानीने रटाळ पद्धतीने सुरू असून त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून गेली दोन वर्ष मसूरकरांना प्रत्यक्षात करावी लागत आहे रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे मसूरकर त्रस्त झाले आहेत तसेच मसूरकरांच्यावर चुकीच्या पद्धतीने लादलेली घरपट्टी शहरी विभागाच्या तुलनेत अवाच्या सव्वा असून या जीजीया करातील त्रुटी दूर करून मसूरकरांना योग्य कर लावून दिलासा द्यावा

या दोन्ही जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत योग्य तोडगा न निघाल्यास गुरुवार दिनांक १७ एप्रिल रोजी मसूरच्या जुन्या बस स्थानक चौकात संतप्त ग्रामस्थांच्या वतीने भव्य रस्ता रोको करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला असून तशा आशयाची निवेदने कराड पंचायत समिती मसूर ग्रामपंचायत मसूर पोलीस स्टेशन यांना ग्रामस्थांच्या सह्यांच्या द्वारे देण्यात आली आहेत.

मसूर ग्रामपंचायत च्या वतीने मसूरकरांच्यावर नियम ांच्या नावाखाली घरपट्टीचा लावलेला जिजिया कर हा अन्यायकारक आणि चुकीच्या पद्धतीचा आहे याप्रकरणी एक वर्षांपूर्वी ग्रामपंचायत ग्रामस्थांची अधिकारी यांच्या बैठकीत चर्चा होऊन घरपट्टी कमी करण्याचा निर्णय झाला होता मात्र त्याची प्रत्यक्षात कारवाई झाली नाही म लकापूर सैदापूर उंब्रज यासारख्या मोठ्या शहरी गावातील उतारे व त्यांना लावलेली घरपट्टी आणि मसूर मधील लावलेली घरपट्टी यामध्ये फार मोठी तफावत आहे. मसूरकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असून या दोन्ही प्रकरणी योग्य तोडगा न निघाल्यास नाविलाजास्तव दिनांक १७ एप्रिलचा रस्ता रस्ता रोको करून या दोन्ही प्रश्नांची जाहीर पोलखोल करून प्रसंगी जनहित याचिका ही दाखल करू असा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

सदर निवेदनावर नंदकुमार जगदाळे लहूराज जाधव नरेश माने बाळासाहेब जगदाळे प्रा कादर पिरजादे किशोर जगदाळे भाऊसाहेब बर्गे वामनराव शिरतोडे युवराज जगदाळे संभाजीराव बर्गे शांताराम मोरे सागर जगदाळे ओमकार जगदाळे सुनील दळवी सुनील माळी गजानन शिरतोडे नितीन जगदाळे श्रीकांत हत्ते चंद्रकांत बर्गे यांच्या स्वाक्षरी आहेत.

# विभागीय लोकशाही दिन १५ एप्रिलला

नवी मुंबई : कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शाह यांनी कळविले आहे.

# गाळमुक्त अभियानचे काम अभिमानाची गोष्ट-शामला खोत पाटील

शिराळा : शिराळा तालुका पाणीदार होणार आहे राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य भारतीय जैन संघटनेने (बीजेएस) स्वीकारले आहे ही अभिमानाची गोष्ट आहे असे प्रतिपादन तहसीलदार शामला खोत पाटील यांनी केले.

येथील तहसीलदार कार्यालयात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचा प्रचार करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांच्या सहाय्याने योजनेची माहिती असणारा जलरथ जिल्ह्यामध्ये




फिरवणार आहे. या जल रथ चे स्वागत करताना त्या बोलत होत्या.यावेळी मोरणा प्रकल्प शाखाअधिकारी तन्वीर मुल्ला , छोटे पाटबंधारे विभागाचे पी. एस. साळुंखे , भारतीय जैन संघटनेचे तालुकाध्यक्ष विकास शहा, जिल्हा समन्वयक विकास शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

तहसीलदार खोत पाटील म्हणाल्या की, योजनेंतर्गत जलाशयांमधील गाळ काढण्याचे काम प्रशासनाने निवडलेल्या स्वयंसेवी संस्था किंवा ग्रामपंचायतींच्या म ाध्यमातून करण्यात येणार आहे. शासनाकडून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी शासनाच्यावतीने अनुदान दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी आवश्यक यंत्रसामग्री व इंधनाचा खर्च शासन करणार असून संपूर्ण प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनामार्फत निधी वितरित केला जाईल.

या योजनांमुळे तलावांची पाणी साठवण क्षमता वाढेल, नाल्यांची वहन क्षमता सुधारेल, भूजल पातळीत वाढ होईल आणि शेतीसाठी उपलब्ध पाण्याचे प्रमाण वाढेल. शेतात गाळ टाकल्यामुळे मातीचा पोत सुधारेल, जमिनीची सुपीकता वाढेल आणि शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे असे सांगितले. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य दिनेश हसबनिस, विठ्ठल पाटील , बालम मुलानी , शरीफ मुल्ला , महेश कुलकर्णी , मंडल अधिकारी , तलाठी , पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# मेहनत असेल तर यश संपादन करता येईल : रणधीर नाईक यांनी




शिराळा : स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून नियुक्त होणारे विद्यार्थ्यांना मुलाखत,ट्रेनिंग, गुणवत्ता व चाचणी परीक्षा पूर्ण करून पुढे जावे लागते. यासाठी प्रचंड मोठा संघर्ष ,जिद्द ,चिकाटी व मेहनत असेल तर यश संपादन करता येईल असेल प्रतिपादन रणधीर नाईक यांनी केले.

दुरंदेवाडी(औंढी) ता.शिराळा येथील आरती भानुदास खोत यांची मुंबई पोलीस पदी निवड झाल्याबद्दल जिल्हा परिषद माजी सदस्य रणधीर नाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. नाईक पुढे म्हणाले, स्पर्धा परीक्षा साठी जे विद्यार्थी अभ्यास करत आहेत. त्यांनी एकाच पदावर किंवा परीक्षेवर अवलंबून न राहता स्पर्धा परीक्षेच्या अंतर्गत येणाऱ्या इतरही परीक्षेच्या विचार करायला हवा.

त्यामधून अनेक विभागामध्ये संधी उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्याला यश संपादन करण्यासाठी निश्चित मदत होत असते .ग्रामीण भागातील मुलांचा स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाकडे मोठ्या प्रमाणात कल वाढल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विभागामध्ये संधी उपलब्ध होत आहेत .प्यायला पाण्याची अडचण असणाऱ्या दुरंदेवाडी गावामधूनही आज मुले अभ्यासाच्या जोरावर शासकीय नोकरीमध्ये समाविष्ट होत आहेत हे शिराळा तालुक्याच्या वतीने अभिमानास्पद आहे.

यावेळी बिऊर उपसरपंच राजू पाटील ,दादासो खोत ,रामचंद्र खोत ,तानाजी खोत,योगेश खोत ,जयवंत खोत, अशोक खोत ,निखिल खोत ,पूजा खोत ,सुनील खोत, प्रतिक खोत ,अमोल खोत, कमल खोत आदी मान्यवर उपस्थित होते.

# राजवीर भिसे राज्यात तृतीय



पाटण - मंथन स्पर्धा परीक्षेचा नुकताच निकाल लागला असून या स्पर्धा परीक्षेत सुयश मेडिकल अँड चॅरिटेबल सोसायटी संचलित,रघुकुल बालमंदिर व प्राथमिक विद्यालय नाडे नवारस्ता या विद्यालयातील इयत्ता २री मध्ये शिकत असणारा राजवीर भिसे हा विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत तिसरा आलेला आहे, तसेच तो आय एम विनर या स्पर्धा परीक्षेमध्ये जिल्ह्यात पहिला आला असून अभिरूप स्कॉलरशिप परीक्षामध्येही त्याने जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवला आहे. याबद्दल त्यांचे रघुकुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्री.विजय देसाई सर,संस्थेचे सचिव मा.सौ. डॉ.रूपाली देसाई मॅडम, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सविता सुर्वे , मार्गदर्शक शिक्षक श्री.महेश पाटील सर, विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग,आजी माजी विद्यार्थी पालक यांनी त्याचे अभिनंदन केले, व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'एमआयडीसी'च्यावतीने वारस नोंदी शिबीराचे आयोजन

बारामती : राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेअंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) बारामती प्रादेशिक कार्यालयाच्यावतीने भुखंड क्र. सी-३९, टु ब्रदर्स कंपनीच्या समोर, सी ब्लॉक, एमआयडीसी, इंदापूर येथे १५ एप्रिल तर सीएफसी हॉल, एमआयडीसी उपविभाग, कुरकुंभ, दौंड येथे १६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता वारस नोंदी शिबाराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबीरात इंदापूर आणि दौंड तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या, भुखंडधारकांच्या समस्या सोडविण्यात येणार आहेत. तरी औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक व भूखंडधारकांनी उपस्थित राहून वारस नोंदी करुन घ्याव्यात, असे आवाहन प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी केले आहे.

# श्री हनुमान यात्रेनिमित्त पुसेसावळी कार्यक्रमांचे आयोजन



पुसेसावळी(सनी लोहोरा) : सालाबाद प्रमाणे पुसेसावळी ता.खटाव शहराचे ग्रामदैवत श्री हनुमान जन्मोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.शनिवार दि.१२ सकाळी ६ वाजता जन्म काळ दुपारी १ ते ४ श्री हैबती महाराज भेदिक मंडळ पुसेसावळी यांचा कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता श्रींचा भव्य छबिना व प्रमुख आकर्षक श्री दत्त हालगी ग्रुप नातेपुते.रविवार दि.१३ रात्री १० वाजता हुतात्मा स्मारक, जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी जल्लोष ऑर्केस्ट्रा पुणे, तसेच सोमवार दि.१४ सकाळी ११ ते ३ ढोलकी सम्राट शंकर पवार संगीता कराडकर, रोशनी पुसेगांवकर यांचा लोकनाट्य तमाशा.सायंकाळी ५ वाजता. कुस्त्यांचे जंगी मैदान ठिकाण हुतात्मा स्मारक जिल्हा परिषद शाळा येथे होणार आहे. व रात्री १० वाजता तानाजीराव भोसले वाघेरीकर यांचा लोकनाट्य तमाशा, ठिकाण हुतात्मा स्मारक जिल्हा परिषद शाळा पुसेसावळी. शनिवार दिनांक १९ सायंकाळी ५ वाजता श्रींचा भंडारा प्रसादाने यात्रेची सांगता होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत, वि.का.स. सोसायटी, भजनी मंडळ, हनुमान ट्रस्ट, व सर्व ग्रामस्थ पुसेसावळी यांच्याकडून करण्यात आले.

# कामेरीची श्रीमान रायगड पतसंस्था शिवरायांच्या विचारावर चालवतील : सम्राटबाबा महाडीक

इस्लामपूर : कामेरीच्या शुभम पाटील यांनी सुरु केलेल्या श्रीमान रायगड पंतसंस्थेमुळे सर्वसामान्य लोकांना फायदा होईल. ही संस्था छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारावर चालणार असल्याचा विश्वास त्यांनी दिला आहे. शुभम व त्यांच्या कार्यकर्यांच्या पाठीशी आम्ही खंबीर पणे उभा असल्याचा विश्वास वनश्री दुध संघाचे चेअरमन व भाजप नेते सम्राटबाबा महाडीक यांनी दिला.

वाळवा तालुक्यातील कामेरी गावचे सुपुत्र विद्यमान ग्रामपंचायत सदस्य शुभम पाटील यांनी सुरु केलेल्या श्रीमान रायगड ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे उदघाटन वनश्री दुध संघाचे चेअरमन व भाजप नेते सम्राटबाबा महाडीक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिनेस्टार विलासबापू रकटे होते. प्राचार्य डॉ.महेश जोशी, बाबासो मजूर सोसायटीचे चेअरमन तुकाराम पाटील, कामेरीचे पोलीस पाटील महादेव पाटील, चेअरमन संदीप पाटील, व्हा.चेअरमन झाकीर मुल्ला, माजी नगरसेवक कपिल ओसवाल, जेष्ठ नेते पै.जयकर कदम,




वाळवा पश्चिम मंडलचे अध्यक्ष डॉ.सचिन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवेल्यांचा सत्कार करण्यात आला.

महाडीक पुढे म्हणाले, ही पतसंस्था चांगल्या प्रकारे चालवतील यात मला शंका नाही. गावातील सर्व लोकांना न्याय देतील. पक्ष , जातपात न मानता शिवरायांच्या आदर्श घेवून वाटचाल तुम्ही करत आहात. ही फार मोठी गोष्ट आहे. कामेरी गावच्या सर्वांगीन विकासासाठी आम्ही कटीबध्द आहे. भारतीय जनता पार्टी व महायुतीच्या माध्यमातून कामेरीच्या विकासासाठी प्रयत्न करू. यावेळी रणजीत पाटील, राहुल पाटील, एम.के.दाजी, शहाजी पाटील, नंदुकाका पाटील, अशोक पाटील(पंच), सरगम मुल्ला, संग्राम गोईंगडे, रविंद्र पाटील, बंजरग पाटील, इंद्रजीत पाटील, सागर मदने, गोविंद पाटील, संग्राम पाटील, विजय पाटील(काका), योगेश पाटील, मनोज कामेरीकर, रमेश पाटील, दिनकर बाबर, गणेश पाटील यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी,कर्मचारी ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.